
# चैतन्य लहरी

जानेवारी / फेब्रुवारी २००६
अक क्रमाक १/२



# ख्रिसमस पूजा २००५ बालेवाडी, पुणे









# अनुक्रमणिका


- संक्रांती पूजा, प्रतिष्ठान पुणे दिनांक ११ जानेवारी २००६ ........ २
- ३१ डिसेंबर २००५, पूजा, प्रतिष्ठान, पुणे ........ २
- सौ कल्पनादीदी वाढदिवस समारंभ,प्रतिष्ठान पुणे , दिनांक २२ डिसेंबर २००५ ........ ३
- म्युझिक प्रोग्राम प्रतिष्ठान, दिनांक ८ जानेवारी २००६ ........ ३
- पब्लिक प्रोग्राम पुणे, दिनांक २६ डिसेंबर २००५ ........ ४
- म्युझिक प्रोग्राम प्रतिष्ठान, दिनांक १७, डिसेंबर २००५ ........ ४
- ज्ञानेश्वरी - सहाव्या अध्यायातील योगमार्गातील विशद केलेला काही भाग ........ ५
- श्री विष्णु माया पूजा (संक्षिप्त) प.पू.श्री माताजींचे भाषण ........ ७
- प.पू.श्रीमाताजींचे शिव-पूजांच्या प्रसंगी केलेल्या प्रवचनातील काही अमृत-कण ........ ११
- ख्रिसमस पूजा दिनांक २४,२५ व २६ डिसेंबर २००५, बालेवाडी,पुणे (वृत्तांत) ........ १३


सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, सहजयोगातील कॅसेट, सी.डी. पुस्तके, मासिके, श्रीमाताजींचे फोटों, कॅलेंडर, चैतन्यलहरी व युवादृष्टी मासिके, श्रीमाताजींची पेंडॉल्स, इ. साहित्य भारतभरातील वितरण व विक्री व्यवस्था ''निर्मल इन्फोसिस्टीम अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजि प्रा. लि पुणे'' या कंपनीमार्फत होत आहे. तरी सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की ,निर्मल इन्फोसिस्टीमस अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजिस प्रा. लि.या कंपनीच्या लेखी परवानगीशिवाय वरील साहित्याची निर्मिती तसेच परस्पर विक्री कुणीही करू नये. तसे केल्यास त्याची जबाबदारी संबंधित सहजयोग्यावर व लीडरवर राहील.

तसेच चैतन्य लहरी मराठी मासिकाचे सन २००६ सालासाठी नवीन सभासदत्व घेण्यासाठी धनादेश पाठविताना तो " NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT.LTD." या नावाने पाठविताना पाकिटावर चैतन्य लहरी (मराठी) लिहिणे आवश्यक आहे. सभासदांची वार्षिक वर्गणी मागील वर्षाप्रमाणेच अंक हातपोच घेणाऱ्यासाठी रुपये २००/- व पोष्टाने मागविणाऱ्यांसाठी रुपये २२५/- एवढी ठेवली आहे. तसेच परगांवच्या सहजयोग्यांनी शक्य झाल्यास ग्रुप बुकिंग केल्यास अंक पोष्टाने पाठविताना सोईचे होईल.कंपनीचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.

NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT. LTD.
BLDG. NO. 8, CHANDRAGUPT HSG. SOC. PAUD ROAD,
KOTHRUD,PUNE 411 O29. TEL. 020 25286537

## संक्रांती पूजा, प्रतिष्ठान पुणे दिनांक ११ जानेवारी २००६

मकर संक्रांतीची पूजा प्रतिष्ठानमधील हॉलमध्ये दिनांक ११ जानेवारी २००६ रोजी आयोजित केली होती. श्रीमाताजी, पापाजी, साधनादीदी व वर्मासाहेबांचे हॉलमध्ये रात्री १०.०० वा आगमन झाले. श्रीमाताजी आज अत्यंत आनंदी दिसत होत्या. त्यांच्यासमोर मुंबईचे श्री चंद्रकांत वझे व सौ अंजली कदरी यांनी सुरवातीला, 'उठा उठा हो सूर्यनारायणा', 'तेजोनिधी लोह गोल', 'ज्योती कलश छलके', 'परब्रह्मरूपिणी माते महालक्ष्मी जय जय जय', 'जागो सवेरा आया है' ही भजने झाली. त्यानंतर श्रीमाताजींच्या चरणावर हार व फुले वाहून श्री राजेंद्र पुगालिया व श्री हरी गायकवाड यांनी पूजा केली. त्यानंतर श्रीमाताजींना संक्रांतीनिमित्त साडी, तिळगुळाचे दागिने, फळांनी तसेच भाजीचा वसा भरलेल्या करंड्या सादर केल्या. तसेच सौ साधनादीदींना खास संक्रांतीनिमित्त मोबाईल प्रेझेंट दिला. त्यावेळी साधनादीदीनी सर्वांना संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या. आज श्रीमाताजी अत्यंत प्रसन्न व सुंदर दिसत होत्या. त्यांची तब्येत चांगली होती.

## ३१ डिसेंबर २००५, पूजा, प्रतिष्ठान, पुणे

आज ३१ डिसेंबर च्या निमित्ताने प्रतिष्ठानच्या हॉलमध्ये म्युझिक प्रोग्रामचे आयोजन केले होते. साधारण १०.०० च्या सुमारास श्रीमाताजीं व पापाजींचे हॉलमध्ये आगमन झाले. त्यानंतर सुरवातीला नाशिकचे श्री गोकुळ सिन्नरकर यांनी तोंडाने सनई वाजविली. त्यानंतर अमरावतीचे श्री संदीप दलाल, श्री मिलिंद दलाल, श्री सुंदरकर यांनी 'सहज मिले बडा भागा' हे भजन सादर केले.त्यावेळी तबल्याला पुण्याचे श्री मिलिंद दाभाडे यांनी चांगली साथ दिली. त्यानंतर वैतरणा ॲकॅडमीच्या श्री पी.के.साळवे कला प्रतिष्ठानच्या विदेशी विद्यार्थांनी श्री अरुण आपटे यांच्या मार्गदर्शनाखाली भजने सादर केली. त्यांनी सुरवातीला 'महामाया महाकाली', 'श्री जगदंबे आई रे', 'बोलो शिव शिव शंभो बम बम बम' ही भजने सादर केली. त्यानंतर ३१ डिसेंबर पूजेनिमित्त श्रीमाताजींना हार अर्पण केला. त्यानंतर श्रीमाताजींना साडी, फुले, मिठाई अर्पण केली. श्री राजेंद्र पुगालिया यांनी श्रीमाताजींना निर्मल इन्फोटेकमार्फत प्रकाशित झालेल्या सर्व कॅसेटचा एक संच व निर्मल इन्फोटेक तर्फे प्रकाशित होणारी पुस्तके, पूजा साहित्याबाबत सर्व माहिती असलेली पुस्तिका सादर केली. त्यावेळी पापाजींनी व श्रीमाताजींनी सदर कॅसेट व पुस्तिका हातात घेऊन त्याची माहिती घेतली . त्यानंतर मुख्य हॉलमधील कार्यक्रम संपला आणि श्रीमाताजी आपल्या शयनकक्षेत परतल्या त्यावेळी साधारण रात्रीचे ११.१५ वाजले होते.

नंतर सर्वांना प्रसाद वाटण्यात आला.रात्री परत बाराच्या सुमारास श्रीमाताजींच्या शयन कक्षेत नववर्षानिमित्त केक कापण्यासाठी सर्वजण जमले. श्रीमाताजींनी पापाजींच्या मदतीने केक कापला.नंतर वैतरणा ॲकडमीच्या विद्यार्थांनी श्रीमाताजींच्या समोर 'गणेशा जय श्री गणेशा', 'जागो कुंडलिनी माँ करो सबपे कृपा',ही भजने सादर केली आणि त्याचवेळी रात्रीचे बाराचा काटा पुढे सरकला. सर्वप्रथम पापाजींनी जागेवर उभे राहून श्रीमाताजींना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर श्रीपापाजींनी जगातील सर्व सहजयोग्यांना नववर्षाच्या शुभेच्या दिल्या आणि रात्री १२.३० वा कार्यक्रम संपला. प्रतिष्ठानच्या बाहेरच्या बाजूला आकाशात फटाक्याची आतषबाजी केली. त्यावेळी सर्वांना केकचा प्रसाद वाटण्यात आला. श्रीमाताजी अत्यंत आनंदी होत्या.

## सौ कल्पनादीदी वाढदिवस समारंभ,प्रतिष्ठान पुणे , दिनांक २२ डिसेंबर २००५

सौ कल्पनादीदींच्या वाढदिवसानिमित्त प्रतिष्ठानमधील कव्वाली हॉलमध्ये कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यासाठी जगभरातून ३००-४०० निमंत्रित उपस्थित होते. कल्पनादीदींचे प्रतिष्ठानवर आगमनाच्या वेळी त्यांच्या गाडीसमोर प्रतिष्ठानच्या आवारात ढोल-लेझीम तसेच हातात भगवे झेंडे घेतलेल्या मुलांनी स्वागत केले. त्याचवेळी बाजूला नऊवारी साडी नेसलेल्या मुली हातात दिवे घेऊन उभ्या होत्या. त्यावेळी कल्पनादीदी सोबत त्यांची मुलगी अनुपमादीदी व हेम साहेब होते सर्वजण स्वागत पाहून एकदम प्रसन्न झाले.नंतर मुख्य कार्यक्रम हॉलमध्ये श्रीमाताजींचे साधारण १०.०० च्या सुमारास आगमन झाले . त्यांच्यासोबत पापाजी, कल्पनादीदी, अनुपमादीदी, हेमसाहेब होते. त्यावेळी स्टेजवर मुंबईचे श्रीवझे आणि सहकारी भजन सादर करीत होते. श्रीमाताजी स्थानापन्न झाल्यानंतर सुरवातीला श्रीमाताजींच्या चरणावर पुष्पमाला अर्पण करण्यात आली. त्यानंतर श्रीपापाजींचे, कल्पनादीदी, अनुपमादीदी व श्री हेमसाहेबांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर श्री वझे आणि सहकारी यांनी भजन सादर केले.

नंतर धरमशाळेच्या मुलांनी श्रीकृष्णाच्या जीवनावर आधारित घटना सादर करून सर्वांची करमणूक केली. त्यावेळी श्रीमाताजी फार आनंदी दिसत होत्या. मुंबईच्या सहजयोग्यांनी कव्वाली सादर केली. त्यानंतर नाशिकचे श्री धुमाळ आणि सहकारी यांनी वाढदिवसानिमित्त खास तयार केलेली भजनं सादर केली . त्यावेळी सौ कल्पनादीदींनी टाळ्यांच्या प्रचंड गजरात श्रीमाताजींच्या समोर केक कापला. त्यांनी सर्व प्रथम श्रीमाताजींना केक भरवला. त्यानंतर पापाजींना केक भरवला. त्यांना अनुपमादीदी व श्री हेम साहेबांनी केक भरवला. त्यावेळी बाजूला स्टेजवर सांताक्रॉस व पऱ्यांचा पेहराव केलेली लहान लहान मुले अवतीभवती होती. कल्पनादीदींच्या हस्ते लहान मुलांना टोप्या, चॉकलेट वाटण्यात आली, ते दृश्य अत्यंत सुदर दिसत होते. त्यानंतर पापाजींनी त्यांच्यातर्फे कल्पनादीदींना श्रीमाताजी व पापाजींचा फोटो असलेली अतिशय सुरेख अशी चांदीची फ्रेम भेट दिली. त्यावेळी कल्पनादीदी म्हणाल्या की, 'माझ्यासाठी यापेक्षा चांगले दुसरे प्रेझेंट असू शकत नाही'. त्यानंतर श्री पुगालिया यांनी कल्पनादीदींना सर्व जगातील सहजयोग्यांच्यावतीने एक उत्कृष्ट अशी काश्मिरी शाल भेट दिली. कल्पनादीदींनी ती शाल लगेच श्रीमाताजींच्या पायावर पांघरली त्यावेळी उपस्थितांनी प्रचंड टाळ्या वाजवून दाद दिली. त्यानंतर पापाजींनी छोटेसे भाषण केले.

श्रीमाताजी व सर्व कुटुंबीय परत आतल्या दालनात गेले. त्यानंतर स्टेजवर वाशीच्या सहजयोग्यांनी महाराष्ट्रातील नृत्य प्रकार सादर करताना सुरवातीला, गणेश वंदन, साई वंदन, लावणी, लेझीम व शेवटी तिरंगा हातात घेऊन असे नृत्य प्रकार सादर करून सर्वांची वाहवा मिळविली. त्यानंतर सर्वांसाठी प्रतिष्ठानमध्ये जेवणाची व्यवस्था केली होती. आज श्रीमाताजी खूपच आनंदी दिसत होत्या.

## म्युझिक प्रोग्राम प्रतिष्ठान, दिनांक ८ जानेवारी २००६

प्रतिष्ठानमधील हॉलमध्ये म्युझिक प्रोग्रामचे आयोजन केले होते. साधारण १०.०० च्या सुमारास श्रीमाताजी व पापाजींचे हॉलमध्ये आगमन झाले. त्यावेळी श्रीमाताजींच्या समोर प्रसिद्ध गायिका श्रीमती मीना फातरपेकर यांनी 'माँ तेरा कैसे ध्यान करू, देवा बोला हो बोला माझ्यासाठी, वैकुंठीचा राणा' ही भजने सादर केली.आज श्रीमाताजी व श्रीपापाजी खूपच आनंदी होते.

## पब्लिक प्रोग्राम पुणे, दिनांक २६ डिसेंबर २००५

पुण्यातील मॉडर्न महाविद्यालयाच्या मैदानावर सहजयोग केंद्र पुणे, लाईफ इटर्नल ट्रस्ट मुंबई तसेच महाराष्ट्रातील सर्व सहजयोग्यांच्या संयुक्त सहभागातून हा कार्यक्रम आयोजित केला होता. या पब्लिक प्रोग्रामचे महत्त्व अनन्य साधारण असे होते. कारण पब्लिक प्रोग्रामच्याच वेळी श्रीमाताजी पुण्यात उपस्थित होत्या. पब्लिक प्रोग्राम संपण्याच्या सुमारास त्या प्रतिष्ठानमधून बाहेर पडून बालेवाडीमधील लग्न सोहळ्यास उपस्थित राहिल्या होत्या. बालेवाडीमध्ये त्यांना पाहिल्यानंतर त्या खूपच प्रसन्न, आनंदी, उल्हासित दिसत होत्या.

पब्लिक प्रोग्रामची सुरवात ७० विविध देशातील बांधवांनी भारतीय संस्कृतीची महती विशद करून तसेच अथर्वशीर्ष, पोवाडा, महाराष्ट्र देशा जागृत करूया कवने करून , संस्कृत भजन, जोगवा सादर करून सर्वांची मने जिंकली. त्यानंतर श्रीमाताजींच्या प्रवचनाची ध्वनीफीत दाखविण्यात आली. त्यात त्यांनी भारतीय संस्कृती, सभ्यता व मूल्ये ही पाश्चिमात्यांना भावतात पण आपली ही भारतभूमी ही योगभूमी असून येथील लोक तथाकथित आधुनिकीकरणाच्या नावाखाली पाश्चिमात्यांचे अंधानुकरण करून आपली, जीवनमूल्ये विसरून दु:खी झाले आहेत. ते आपल्या देशाकडे आशेने पाहत आहेत. आपण भारतीयांनी आपला आत्मिक शांततेचा वारसा जपला पाहिजे व तो सर्व जगाला दिला पाहिजे. सांस्कृतिक आक्रमणाचा धोका ओळखून सर्वांनी आपल्या आत्मसाक्षात्काराला प्राप्त करून घेतले पाहिजे असे प्रतिपादन केले. त्याचप्रमाणे सर्व उपस्थितांना आत्मसाक्षात्काराची अनुभूती दिली.

त्यानंतर या कार्यक्रमात टिम ब्रुसी (यु.के.), फिलीप्स (स्विझरलँड), गिव्होनी (इटली), या विदेशी मान्यवर पाहुण्यांनी हिंदुस्थानी संस्कृतीचे तसेच आध्यात्मिक संपत्तीचे महत्त्व विशद करून सांगितले. भारतीय मूल्ये ध्यानपद्धती, तसेच सहजयोग साधना पद्धतीचा अंगीकार केल्यामुळे आमच्या अपप्रवृत्ती.व्यसनाधीनता, भौतिकवाद, चंगळवाद इ. गोष्टी लोप पावून आम्हास जीवनाचा खरा अर्थ व आनंद प्राप्त झाला हे विशद केले. तसेच आमचे अंधानुकरण करून तुम्ही आमच्या प्रमाणे शारीरिक, मानसिक, नैतिक व सांस्कृतिक अध:पतन करून घेऊ नका असे कळकळीचे आवाहन करण्याकरिता आम्ही या पुण्यभूमीत आलो आहोत असे सांगितले.

कार्यक्रमाची सांगता विदेशी लहान मुलांनी हातात भारतीय राष्ट्रध्वज घेऊन म्हटलेल्या हृदयस्पर्शी अशा वन्देमातरम् या गीताने झाली आणि खऱ्या अर्थाने जगभरातील लोकांनी भारत मातेला वंदन केले हे पाहून सर्व लोक भारावून गेले. उपस्थितांना आत्मसाक्षात्कार प्राप्त झाल्याच्या आनंदात सर्वजण आपल्या घरी परतले.अशा प्रकारे विदेशी सहजयोग्यांच्या मदतीने प.पू.श्रीमाताजींच्या पुण्यातील वास्तव्याच्या प्रचंड आशीर्वादात सदर आत्मसाक्षात्काराचा कार्यक्रम पार पडला.

## म्युझिक प्रोग्राम प्रतिष्ठान, दिनांक १५, डिसेंबर २००५

प्रतिष्ठानमधील हॉलमध्ये म्युझिक प्रोग्रामचे आयोजन केले होते. साधारण ९.४५ च्या सुमारास श्रीमाताजी व पापाजींचे हॉलमध्ये आगमन झाले. त्यावेळी श्रीमाताजींच्या समोर तळेगांव ग्रुपने, 'माँ मेरा एक सपना' हे भजन सादर केले. पुणे म्युझिक ग्रुपने 'नॉन स्टॉप गोंधळ' सादर केला. त्यानंतर सिंहगड ग्रुपने 'कैसे खेलू होली सावरिया' हे भजन सादर केले. शेवटी पुणे म्युझिक ग्रुपने 'मेरी माता का करम है मेरी माता का करम है' ही कव्वाली अत्यंत सुंदर रीतीने सादर केली. कव्वाली संपली त्यावेळी श्रीपापाजींनी स्वत: उभे राहून टाळ्या वाजवल्या. ही कव्वाली श्रीपापाजींना खूपच आवडली. त्यानंतर श्रीपापाजींच्या हस्ते सर्व ग्रुपमधील प्रमुख कलाकारांना श्रीमाताजींच्या हस्ते बक्षीस देण्यात आले. आज श्रीमाताजी व श्रीपापाजी खूपच आनंदी होते.

# ज्ञानेश्वरी - सहाव्या अध्यायातील योगमार्गातील विशद केलेला काही भाग

सहाव्या अध्यायातला हा संवाद अथांग विवेकसागर आहे. त्यात चर्चिलेला विषय हा आदिप्रकृतीचा आहे. ज्याप्रमाणे क्षीरसागरातून अमृत निघाले, त्याप्रमाणे हा अध्याय संपन्न योगविद्येच्या भांडारातून निघाला आहे. वस्तुतः गीतेची खरी सुरवात येथूनच आहे. यापूर्वीचे अध्याय हे जमिनीत पेरलेले बी आहे व ही गीतावेल सहाव्यापासून अंकुरली आहे. मी ज्ञानदेव हा सहावा अध्याय सर्व साहित्यगुणांनी अलंकृत करून तुम्हाला सांगणार आहे. लक्ष देऊन ऐका.

अहो माझे सहजचे उत्स्फूर्त बोल आपल्या बलाने परतत्त्वाला जिंकून आणणारे आहेत आणि तरीही त्या बोलांच्या ध्वनिलहरी नादब्रह्माच्या संगीत लहरींपेक्षा कोमल असणार आहेत. एकटा सूर्य जसा सर्व जगाला प्रकाश देऊन आनंदवितो, तसे माझे बोल श्रोत्यांच्या सर्व इंद्रियांना सुख देतील. पण माझ्या बोलांचे हे व्यापक सामर्थ्य ज्यांना शब्दाच्या धात्वर्थाचे सुयोग्य ज्ञान लाभले असेल त्यांनाच उमजेल. त्यांना जणू चिंतामणी रत्न लाभले असे वाटेल. मोक्षाचे पक्वान्न भरून, मी ही ज्ञानपूर्ण ताटे वाढणार आहे. त्याचा अर्थ समजण्यासाठी चित्तावर साठलेले पूर्वसंस्कार काढून टाकावे आणि आनंददायी परतत्त्वाच्या राशीवर जाऊन बसावे.

भगवंत काय म्हणताहेत, हे बुद्धीला कळावयास अवघड आहे. पण गुरू निवृत्तिनाथांच्या कृपेमुळेच, ते योग्य शब्दात मांडणे शक्य होणार आहे. भगवंत म्हणतात, पार्था ! चित्त देऊन ऐक. जो पुरुष, फलांचा लोभ न धरता कर्मे आचरतो, त्याला जाणकर लोक योगी मानतात. स्वधर्माचरण करताना ज्या पुरुषाला ज्या कर्माचरणांचा मी कर्ता आहे अशी जाणीवही नसते व जो फलाविषयी पूर्ण अनासक्त असतो, तो पुरुष नुसता योगी नव्हे, तर योगीश्वर होय! स्वधर्मपालन व उदरनिर्वाह होत रहावा यासाठी करावी लागणारी कार्ये जो पूर्ण निरिच्छ राहून आचरतो तोच योगी होय. सर्व शास्त्रे हेच तत्त्व सांगतात, ज्याने संकल्पातून जन्मणारी -मी - माझे- ही भावना टाकली तोच योगी.

योगी पुरुषांची लक्षणे तुला आता सांगतो. त्याचे चित्त आत्मानंदाच्या माजघरात राहते आणि बाहेरील देहभावांकडे ते फिरकतच नाही. सुख-दुःखे त्याच्यावर काहीच परिणाम घडवू शकत नाहीत. पार्था, इंद्रिये आपापली, कार्ये आचरत असताना त्या कार्यामध्ये ज्या पुरुषाला -मी करत आहे- व मला हे फल पाहिजे असे भाव अस्थिर करत नाहीत तोच योगी झाला. योगी पुरुष हा आपल्यातील अहंकाराचा नाश करून आपले कल्याण साधतो. त्याची बुद्धी या सुंदर भासणाऱ्या देहामध्ये गुंतून रहात नाही. सर्वत्र आत्मतत्त्वच पसरलेले आहे याची त्याला जाणीव असते.

ज्याने सर्व इच्छांचा त्याग करून आपले चित्त स्वच्छ व शांत केले, त्याला परतत्त्व लाभणारच. कारण ते त्याच्या चित्तातच असते. जसे सोन्याचे कीट काढले की सोने स्वच्छ होते, तसेच चित्ताने फलांची आशा व आपण फक्त देहच आहोत ही भावना- हे दोन दोष टाकून दिले की, चित्ताला चित्तातल्याच आत्मतत्त्वाशी जाणीव होऊ लागते.

ज्याला हा योग साधला त्याला, इतरांना ज्ञानेंद्रियांनी भासणारे विश्व निरर्थक वाटते. त्याला सर्वत्र ज्ञान- चैतन्य जाणवत असल्याने माती, दगड, सोने इत्यादि सर्व एकाच परतत्त्वाचे आविष्कार आहेत याचे ज्ञान झालेले असते. म्हणून या सर्वांकडे तो आत्मतत्त्वाच्या जाणिवेतून बघत असतो. सर्वत्र भगवंताचेच अस्तित्व

आहे ही भावना त्याच्या ठिकाणी दृढमूल असते. म्हणून त्याला कोठल्याच सजीव किंवा निर्जीव गोष्टींची अपेक्षा असत नाही.

– अर्जुना, ज्या मार्गाने गेले म्हणजे संत होता येते, त्या मार्गाचे वर्णन करतो, ते नीट ऐक. या मार्गाची सुरुवात कार्य करण्यापासून (प्रवृत्ती)होते. पण जे फळ लागते ते मोक्षमय असते. (निवृत्ती) सरळ आत्मतत्त्वाकडे घेऊन जाणारा हा मार्ग आहे. हा मार्ग नीट समजला की साधक तहानभूक विसरतो आणि त्वरित वाटचाल करू लागतो. भगवान पुढे सांगतात की, अरे, या मार्गाचा उपयोग त्याचा अभ्यास करणाऱ्यालाच होतो. कारण अभ्यास म्हणजेच वाटचाल होय. या अभ्यासाने मन निश्चल होते. एक आनंदावस्था प्राप्त होते.

ज्यावेळेस, साडेतीन वेढे घालून झोपी गेलेली, सर्पिणीच्या आकाराची कुंडलिनी शक्ती जागी होऊ लागते, त्यावेळी पिवळी नागीण केशराने न्हावी तशी ती दिसते. ती अतिशय तेजस्वी असते. संतुष्ट झालेली जगदंबा कुंडलिनी सुषुम्नेच्या तोंडाशी येते. देहाची चैतन्यशक्ती माता कुंडलिनीच्या बरोबर सुषुम्नेत प्रवेश करते. हे होत असताना मस्तकातले चंद्रामृताचे तळे पाझरून ते अमृत कुंडलिनीच्या तोंडात पडू लागते. म्हणून योग्याचा देह तेजःपुंज होऊ लागतो.

कुंडलिनी सुषुम्नेच्या मार्गाने वर चढत असते. त्याचवेळी सहस्रार कमळ अधिक फुलू लागते. त्या कमळामध्ये शिवतत्त्व असते. कुंडलिनी माता आपली तेजाची सामग्री त्या शिवतत्त्वाला नजराणा म्हणून अर्पण करते. म्हणजेच जीवशिव ऐक्य साधले जाते. तो परब्रह्ममय होतो.

या ऐक्याच्या वर्णनाविषयी बोलता येत नाही व कोणालाही ऐकता येत नाही. विशाल दैवयोगाने ते अनुभवता येते.

भगवंत म्हणतात, हे परमतत्त्व म्हणजे मीच होय. भक्तांच्या प्रीतीने व त्यांच्या रक्षणासाठी मी येथूनच मानवी अवतार घेत असतो.

अरे ! जे लोक मी वर सांगितलेल्या मार्गाची वाटचाल करतात, ते शेवटी माझ्याच ठिकाणी येऊन पोहोचतात.

खरे तर या योगाइतके सोपे दुसरे काहीच नाही. चित्त एकदा बाह्य वस्तूकडून अंतरात वळले की आपणच आत्मतत्त्व आहोत याचा त्याला अनुभव येतो व ते आनंदी राहते. नंतर त्या चित्तावर बाह्य जगातून होणारा कोणताच आघात परिणाम करू शकत नाही.

हे अर्जुना, –सर्व विश्व हे ईश्वरतत्त्वाचा पसारा आहे. – हा भाव तू बुद्धीने घट्ट पकडून ठेव. अर्थात मग चित्त कुठेही गेले तरी ते ईश्वरतत्त्वाशीच संयोग पावत आहे असे तुला समजेल. हे साधले म्हणजे शुभाशुभ कर्मे वा सुखदुःखे उरणार नाहीत. कारण जे जे होत असते ते ते ईश्वरतत्त्वाचे प्रकटीकरण आहे असा भाव बुद्धीने पकडलेला असतो. या वर्णनानेही आत्मसुख लाभते. भगवंत म्हणतात,–अर्जुना ज्याची आत्मानंदावर निष्ठा असते, तो मोक्ष मिळवणारच. तो वाटचाल करत असताना कालवश झाला तर त्याला स्वर्गामध्ये जे तेथील देवतांनाही लाभत नाहीत असे सुखलाभ होतात.

सर्व साधकांचे ध्येय, ही अवस्था साधणे एवढे एकच असते. असा हा योगी देवांनाही देवासारखा वाटतो. तो माझे चैतन्य होय. म्हणजे खरोखर मी देह असतो व तो योगी म्हणजे माझ्या देहाची चेतना होय. त्याच्या माझ्या या अशा प्रेममय अवस्थेचे वर्णन करता येणार नाही–

(संदर्भ– संपूर्ण सुलभ ज्ञानेश्वरी – सम्राट प्रकाशन )

• • •

## श्री विष्णु माया पूजा
(संक्षिप्त)



प.पू.श्री माताजींचे भाषण, शॉनी; पेनिसिल्व्हीया, अमेरिका, १९ सप्टेंबर १९९२

जेव्हा आपले काही चूक नाही असे वाटते आणि अशा कठीण परिस्थितीतून बाहेर पडायचे असेल तर तुम्ही पूर्ण श्रद्धेने सहजयोगांचा मार्ग स्वीकारा.

आज आपण विष्णुमाया पूजा करत आहोत. ही विष्णुमाया कोण? अमेरिका हा देश आहे ते कुबेर (संपत्ती) आहेत तसेच यम (मृत्यू) आहेत. ते कुबेर आहेत म्हणून इतर कुठल्याही देशापेक्षा इथले लोक श्रीमंत आहेत. पण तुम्हाला संतुलन असले पाहिजे कारण महालक्ष्मी ही कृष्णाची शक्ती आहे. तेथे साधक वृत्तीला महत्त्व आहे. महालक्ष्मी तत्त्व अमेरिकेत कार्यान्वित झाले पण लोकांना कुठल्या मार्गाने जावे याचे तारतम्य राहिले नाही. आणि खूप लोक खोट्या आश्वासनांनी व जाहिरातीनी मोहून गेले. जेव्हा साधक वृत्ती दिसू लागली अशा वेळी श्रीमाताजी अमेरिकन्सना इशारा देण्यासाठी आल्या होत्या, कारण त्यांच्या लक्षात आले की जगातील बुवांना अमेरिका ही एक उत्तम बाजारपेठ आहे. म्हणून जगातील इतर ठिकाणचे बाबा अमेरिकेकडे धाव घेतील हे पक्के, पण कोणी ऐकण्याच्या स्थितीत नव्हते. या गुरूंनी अमेरिकन लोकांची कमजोरी ओळखली. त्यांच्या अहंकाराचे फाजील गुणगाण गात अगदी साध्या उथळ गोष्टी सांगितल्या. उदा. तीन फुटावरून उडण्याची क्षमता मिळेल. या कल्पनेने सगळे भारावून गेले, हे त्यांना काहीतरी विशेष वेगळे वाटले. जरी काही लोक पैशाच्या मागे होते व सत्याच्या शोधात असले तरी सत्यासाठी पैशाची आवश्यकता नसते हे जाणण्या इतपत त्यांचे महालक्ष्मी तत्त्व जागृत नव्हते व या सर्व अगुरूंच्या भोवऱ्यामध्ये ते अडकले होते. आता या वर्षी पहिल्यांदा सर्व काही नीट होणार असे वाटते.

विशुद्धी हे एक महत्त्वाचे चक्र आहे. डावी ते विशुद्धी चक्र पकडले तर तुम्हाला अन्जायना, स्पॅाडिलायटीस व शिथील इंद्रिये हे रोग जडतात. डावी विशुद्धी पाश्चात्यांच्या बाबतीत एक फॅशन झाली कारण ख्रिस्ती धर्मात आपण कबूल करतो की मी पापी आहे नव्हे जन्मत:च पापी आहे. म्हणजेच तुम्हावर पापाचा ठसा येतो. तुम्ही स्वत:ला दोषी म्हणवून घेऊ लागता आणि या दोषांच्या भावनेने तुमची डावी विशुध्दी पकडते.

अमेरिकेच्या लोकांना आज सुद्धा आपण जास्त दोषी आहोत अशी भावना आहे. हा त्यांचा एक मोठा दोष आहे. साध्या गोष्टीत सुद्धा स्वत:ला दोषी समजतात. कारण त्यांना बिलकुल आत्मविश्वास नाही.जरी ते उद्धट व दिखाऊपणा करणारे असले तरी त्यांना वाटते आपले राष्ट्र हे लहान आहे, त्याला काही परंपरा नाहीत. त्यांना इंग्लिश व फ्रेंच लोकांत कृत्रिमता दिसते तर (आशियाई)भारतीय मागासलेले वाटतात. पण त्यामुळे ते भलतीकडेच वहावत जाऊन आपला रस्ताच चुकले, सगळे काही फिसकटले आणि त्यामुळे त्यांची डावी बाजू विशुद्धी खराब झाली.

जेव्हा तुम्ही तुमच्या चुकांना सामोरे जाऊ शकत नाही तेव्हा या चक्रावर पकड येते .जर चूक केली असेल तर तुम्ही कबूल करा आणि त्याच्यापुढे ती होणार नाही असे तिला सामोरे जा.हे त्यांना नको आहे. त्यांना स्वत:ला दोषी वाटते ती मग तिकडेच जमा होणार.(डाव्या विशुद्धीकडे) अशा प्रकारे दोषांचे काळे ढग जमा करतात आणि मग जी विष्णुमाया वीज म्हणून आहे ती या ढगांच्या संघर्षातून बाहेर पडते. त्यामुळे पाऊस पडतो. या लोकांवर कार्यान्वित होते. त्यांना एक धक्का बसतो, ते संवेदनाक्षम

होतात मग ते निराश होऊन विचारतात, आम्ही निराश का आहोत? काय समस्या आहे ? आणि या विष्णुमायेच्या शक्तीने त्यांचे दोष उघड होतात.

विष्णुमायेचा उगम तसा लक्षणीय आहे. विष्णुमाया ही श्रीकृष्णाची बहीण असून तिचा जन्म श्रीकृष्णाच्या जन्मानंतर झाला. प्रत्यक्ष ती त्याची स्वत:ची बहीण नव्हती पण ती नंद व यशोदाची कन्या होती. पण कृष्णाला पर्याय म्हणून तिला ठेवण्यात आले. कंसाला सांगण्यात आले ते आठवे अपत्य आहे पण ती मुलगी असल्यामुळे ती त्याच्या हातून आकाशात फेकली गेली आणि तिने जाहीर केले की, श्रीकृष्णाने अवतार घेतला आहे आणि तो तुझा वध करणार. म्हणजे ती अवतरण जाहीर करते आणि शुभघटना सुचविते. एवढेच नाही तर ती वाईट गोष्टींना भस्मसात करते.

महाभारताच्या पर्वकाळात ती द्रौपदी म्हणून जन्मली: तिचे वस्त्रहरण करण्याचा दुर्योधनाने प्रयत्न केला तेव्हा श्रीकृष्णाचा तिने धावा केला व तो त्यामुळे द्वारकेहून तिच्या रक्षणार्थ धावला. त्यामुळे साड्या फेडता फेडता दुर्योधन पार थकला व शेवटी मूर्च्छित होऊन पडला. ही विष्णुमाया ही कुमारी असून ती सर्व पंचमहाभूतात व्याप्त आहे, हे पाच पांडवांच्या- बरोबर तिच्या विवाहाच्या वेळेस दिसून आले. या तिच्या कौमार्यशक्तीने कौरवांची पापे तिने उघडी पाडली, कारण ते राज्य मिळवू इच्छीत होते आणि धर्माचा नाश करू पहात होते. ती आग्रह धरून सांगते की तुम्ही युद्ध करा. धर्म प्रस्थापण्यासाठी युद्ध करा.

भाऊ म्हणून श्रीकृष्णाने तिचा सांभाळ केला. म्हणून भारतात भाऊ बहिणीच्या नात्याला फार महत्त्व आहे आणि सहजयोगात सुद्धा त्यासाठी रक्षाबंधन व भाऊबीज करतात म्हणून रक्षाबंधनात आम्ही भावांना राखी बांधतो. ही राखी म्हणजे विष्णुमाया शक्तीने भावाचे रक्षण करणे. भाऊ बहिणीचे हे नाते म्हणजे जाणिवेचे समवयस्कतेचे रक्षणात्मक, शुद्ध प्रेमाचेच द्योतक आहे. हेच विष्णुमायेचे कार्य आहे.

थोडेसे खोलात जाऊन विचार केला तर विशुद्धी म्हणजे पाश्चात्यांत सतत दोष लावून घेण्याची व त्यापासून दूर जाण्याची कृती; अगदी क्षुल्लक गोष्टीत सुद्धा. कारण पाश्चात्य संस्कृतीत शिस्त काटोकोरपणा उदा. चमचा टेबलावर विरुद्ध बाजूला ठेवला किंवा चुकून थोडी कॅाफी सांडली तरी तुम्ही अपराधी, समजता, ही दोषी वृत्ती एवढी वाढली की स्वत:ला ठीक न करता, मी अपराधी - ही जाणीव वाढून जीवनातील सूक्ष्मता निघून जाते. सहजयोगात स्वत:ला दोष लावण्यामुळे तुमची डावी बाजू पकडते. तिचा सेंट्रल नर्व्हस सिस्टिमशी (नस)संबंध असल्यामुळे तुम्हाला हातावर चैतन्य जाणवत नाही.त्या नसेला ती चेपता त्यामुळे डावीकडे काहीच जाणवत नाही. डावीकडील ही पकड तेव्हाच जाणवू लागते ज्यावेळी तिचे एका व्याधीत रूपांतर होते.

अगदी खोलात पाहिले तर विष्णुमायाजी आहे ती फक्त सत्य जाणते. जेव्हा ती चमकू लागते तेव्हा सर्व काही स्वच्छ दिसते. जेव्हा ती तुमच्यावर कार्यान्वित होते तेव्हा सत्य उघडे करते. तुमची डावी विशुद्धी अधिक वाढली तर ती निघून जाते. मग तुम्हाला डावीकडे काहीच जाणवत नाही. डावी बाजू बधिर होते, आणि सर्व व्याधींना मुक्त वाट मिळते आणि याच प्रमुख कारणांमुळे पाश्चिमात्य देशांत भारतापेक्षा डावीकडील व्याधी असलेले जास्त लोक सापडतात.

म्हणूनच दोष लावून घेणे चूक आहेच पण ते भ्रामक आहे. तुम्ही एखाद्या गोष्टीचा दोष लावून घेता तर त्याचा काय उपयोग आहे? ते निरर्थक आहे. एखादी रिकामी गोष्ट वाहून नेणे आहे म्हणून एखादी चूक घडली असे तुम्हाला वाटले तर तिला सामोरे जा व पुन्हा करणार नाही असे म्हणा. जर तुम्ही स्वत: दोषी समजला तरी तीच चूक पुन्हा करता. पुढे ती इतकी अंगी बाणते की चूक झाल्याची जाणीवच होत नाही आणि पुढे लक्षांत न येता चुका राहतात. मग तुम्ही

# विवाह समारंभ, २६ डिसेंबर २००५, बालेवाडी, पुणे











# ३१ डिसेंबर २००५, प्रतिष्ठान, पुणे













# संक्रांती पूजा, ११ जानेवारी २००६,प्रतिष्ठान, पुणे













# कल्पनादीदी वाढदिवस समारंभ, २२ डिसेंबर २००५, प्रतिष्ठान, पुणे








ठासून म्हणता मग त्यात काय चुकलं? कारण त्यांना कबूल करायचे नसते व ते उद्धटपणात परिवर्तित होते. पण उद्धटपणाच्या बुडाशी असतो दोषीपणा. अमेरिकन लोक सामूहिक आहेत, म्हणजे जगात जे घडते त्याची चिंता त्यांना असते पण दोषीपणाची वृत्ती त्यांना संवेदना विरहित करते व सत्यापासून दूर नेते. उदा. ते एखाद्या जुलमी देशाची बाजू घेतील पण कोणी येऊन असे म्हणणार नाही की ही आमची चुकी आहे आणि ते थांबले पाहिजे.आता, हे फारच आहे, माझ्याकरिता जास्तच आहे. या वृत्तीने ते काही तरी करतात व ते पूर्ण उजवीकडे झुकतात. त्यातून निरनिराळ्या यंत्रांची व शस्त्रांची निर्मिती करतात. पण शास्त्र निष्कर्षाप्रत जात नाही आणि ते तुम्हाला पूर्णत्वाकडे वा सत्याकडे नेऊ शकत नाही. म्हणून विष्णुमाया आपली शक्ती प्रकट करते. ती अशा गोष्टी प्रकट करते की लोक घाबरून जातात. ती कोठल्याही तत्त्वात प्रवेश करू शकते. तिने जर जलतत्त्वात प्रवेश केला तर मोठे वादळ निर्माण करील. ती काहीही घडवू शकते. ती जेव्हा कोठल्याही तत्त्वात प्रवेशते तेव्हा ती संप्रेरक होते.

आज ही विष्णुमायेची पूजा तुम्ही ठेवली. याबद्दल मला आनंद होतो ती अशी शक्ती आहे की सहजयोग्यांनी तिच्यावर स्वार झाले पाहिजे. तुम्ही तिचे स्वप्न करू शकता कारण ती तुम्हाला तेथे पाहते. तुमची काळजी घेते व जीवन सुरळीत करते.

पैसा सर्वकाही नाही जे अमेरिकन लोकांना पटवून देणे कठीण आहे. अडचण अशी आहे की लोक इतके पैशाच्या व्यसनाधीन झाले आहेत की संपूर्ण जीवन-मूल्यांचा ऱ्हास होऊ लागला आहे. त्यामुळे ज्या कशाने पैसा मिळू शकतो त्याच्यातच ते गुरफटून जातात. म्हणून मानवांच्यासाठी मूलभूत असलेले, आधारभूत असलेले पावित्र्य नाहीसे झाले. जेव्हा तुम्ही विष्णुमायेच्या कौमार्याचा अपमान करता तेव्हा परिणामी त्यांच्या मायेचा, अर्थात खेळाचा प्रादुर्भाव म्हणजे एडस् होतो, इतर सर्व प्रकार ज्याला गुप्त रोग म्हणता येईल अशा प्रकारचे दुर्धर रोग होतात.

विष्णुमाया कुमारी आहे ती पावित्र्याचा आदर करते. हे पावित्र्य स्त्रियांपुरतेच नाही पण जे पुरुष पावित्र्याचा नीतिमत्तेचा अनादर करतात त्यांचा सुद्धा ही समाचार घेते. सिनेमा व इतर दूषित गोष्टीमुळे लॉस एंजिलीस धोक्यात आले याबद्दल मला बिलकूल आश्चर्य वाटत नाही. पण येथे सहजयोग रुजू लागला आहे; त्यामुळे या गोष्टी कदाचित टळतील.पण अजून धोका आहेच कारण विष्णुमाया ही शक्ती तुम्हाला भ्रमात वा मायेत ओढू शकते. ती माया दूर करू शकते किंवा काहीही भस्मसात करू शकते.

विष्णुमाया ही तुम्हाला मार्गावर आणते. जर अपराधीपणाच्या नावाखाली दोषांवर व चुकांवर तुम्ही पांघरूण घातले तर त्या वैयक्तिक, सामूहिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर असो, चुका उघड्या होतात. कारण कोणत्याही गोष्टीत ती प्रवेश करू शकते.

नैसर्गिक आपत्तीही विष्णुमाया निर्माण करू शकते. आणि हे हादरे बसून सुद्धा त्यांचा संबंध आपल्या चुकांशी लावतात. व त्यांना सामोरे न जाता व दूर न करता त्या आपल्या डाव्या विशुद्धीत जतन करून ठेवतात.

म्हणून जेव्हा डावी विशुद्धी बिघडते त्यावेळी हंस चक्रावर परिणाम होऊन तुमचे तारतम्य गमावले जाते. आणि मग कोठली गोष्ट विधायक आहे का मारक आहे, हेच समजत नाही आणि मग तुम्ही बाधक बाबींचा स्वीकार करता कारण तुमची डावी विशुद्धी बिघडलेली असते. मग हात वर करता व मग त्यात काय बिघडले? त्यामुळे हिंसाचार, लाचखोरी, फसवणूक या वृत्ती बळावल्या. अशा वेळी जेव्हा आपले काही चूक नाही असे वाटते आणि अशा कठीण परिस्थितीतून बाहेर पडायचे असेल तर तुम्ही पूर्ण श्रद्धेने सहजयोगाचा मार्ग स्वीकारा. डाव्या विशुद्धीचा त्रास कमी करण्यासाठी हाच एक पर्याय आहे. पण मी जर तुम्हाला काही सांगितले तर तुम्हाला त्यात दोष वाटायला लागतो.

तुम्ही जे काही केले ते तर संपले आणि तुम्हाला क्षमा करण्यात आली आहे. नाहीतर तुम्ही विष्णुमायेच्या तावडीत जाल.

उजव्या बाजूचे लोक रागीट असतात; दुसऱ्यावर वर्चस्व गाजवतात व इतरांना ताब्यात ठेवतात. त्यांचे वैशिष्टय असे की ते डावी विशुद्धी स्वच्छ करण्याऐवजी आपले दोष डाव्या विशुद्धीवर साठवितात. मी नेहमी सांगते की ही अहंकाराचीच अवांतर निर्मिती आहे. अपराधीपणामुळे तुम्ही स्वत:लाच नाही तर दुसऱ्याला इजा पोहोचवता. विष्णुमाया दोन गोष्टीमुळे बाधित होते. एक धूम्रपान व दुसरे लोकांना ठाऊक नाही, ते म्हणजे मंत्र.

विष्णुमायेकडून मंत्राना शक्ती प्राप्त होते आणि ईश्वरी शक्तीशी तुमचा संबंध जोडला न जाता तुम्ही मंत्र उच्चारले तर शॉट सर्किट होऊन तुम्हाला घशाचे त्रास, इतर अनेक त्रास होतात. कारण श्रीकृष्ण व विष्णू हे एकच आहेत. तुम्ही विराटाच्या स्थानाच्या समस्येतही अडकता.

काही लोक आपली चूक झाकण्यासाठी उदारपणा दाखवितात, अशा तऱ्हेने चुका झाकण्याचा राजमार्ग तुम्हाला चुकीच्या ठिकाणी नेईल. हे विष्णुमायेला चालत नाही. कारण ती तुम्हाला पूर्णपणे जाणते आणि तुम्ही अनेक क्लृप्त्या लढविल्या तरी ती आपली शक्ती प्रकट करेलच.

तर डावीकडच्या समस्या विष्णु मायेशी संबंधित असतात. ती तुम्हाला शिक्षा करेल, उघडे पाडेल तशीच ती तुम्हाला मार्गावर आणेल. या सर्व शक्ती लक्षात घेऊन आज आपण विष्णुमायेचे पूजन करणार आहोत. अमेरिकन्स जे स्वत:ला दोषी समजतात; त्यांनी हृदयापासून शपथ घेतली पाहिजे, माताजी आम्ही निर्दोष आहोत. एवढ्या उच्चारणानेसुद्धा तिला प्रसन्नता वाटेल. तुम्ही स्वत:कडे दोष घेणार नाहीत. जर तुम्ही चूक केली तर ती तुमच्या डोक्यावर असेल. ती तुमच्या डाव्या विशुद्धीवर नसणार आणि जर तेथे (सहस्रारावर) थोडी असेल तर तेथे तुमच्या चुकीच्या कृत्याचा दोष ठेवला तरी त्याची तुम्हाला काळजी करण्याचे कारण नाही.

या अमेरिकेच्या भेटीमुळे मला खूपच आनंद वाटतो आणि या वेळी निश्चितच सर्व ठिकाणी कार्यसिद्धी झाली.

पाश्चात्य लोकांनी, हे निसर्गदेवा माझा काही दोष नाही, असा मंत्र म्हटला पाहिजे. तुम्ही निसर्गाविरुद्ध जाऊन चुका करणार नाहीत; त्यामुळे निसर्गाविषयीच्या समस्या सुटतील, सुधारतील. स्वत:चा धि:कार करण्याची, मानभंग करण्याची वा कमी लेखण्याची जरुरी नाही. स्वत:पासून स्वत:ला अलग पहा. जसे आरशांत पाहून बोलता. तुम्ही नदीकडे जा, समुद्राकडे जा आणि म्हणा, ही चूक मी केली परत करणार नाही. तुम्ही या तत्त्वांना आश्वासन द्या. कारण विष्णुमाया या तत्त्वांना छेदू शकते. तिच्यापर्यंत हा संदेश पोहोचेल, मग ती या तत्त्वात प्रवेश करणार नाही व तुम्हाला त्रास देणार नाही.

तुम्ही समुद्रावर जा आणि सांगा अमेरिका दोषी नाही त्याने जे काही केले त्याकरिता हे जर सहजयोग्यांनी केले तर विष्णुमायेला पटेल कारण सहजयोग्यांचे जेनेटिक्स बदलले आहे. कलियुग आणि सत्ययुगामध्ये येणाऱ्या या विशेष त्रेतायुगात आपण ज्या चुका केल्या त्यांची भरपाई दिली पाहिजे. केवळ दोषपत्करून कार्य होणार नाही. तर त्यासाठी आत्मसाक्षात्कार घेतला पाहिजे. यातून जेनेटिक्स बदलेल आणि निसर्गाकडे जाऊन सांगू शकता; आम्ही निर्दोष आहोत; आम्हाला आमचा निसर्ग मिळाला. आम्हाला आत्मसाक्षात्कार लाभला आणि मग सर्व ठीक होईल. मला खात्री आहे तुम्हा सर्व सहजयोग्याकरवी या देशावरील संकटे टळतील.

ईश्वराचे तुम्हाला अनंत आशीर्वाद.

# शिव पूजा

## प.पू.श्रीमाताजींचे वेळोवेळी झालेल्या शिव-पूजांच्या प्रसंगी केलेल्या प्रवचनांतील काही अमृत-कण

..... श्री शिव म्हणजे आपल्या हृदयांतील सदाशिवांचे प्रतिबिंब.सदाशिव म्हणजेच प्रममपिता परमेश्वर; तेच आदिशक्तीच्या निर्मिती-लीलांचे साक्षी; आपलीच लीला चालल्यासारखे ते आदिशक्तीची क्रीडा पहात असतात. आदिशक्तीच्या मागें त्यांची पूर्ण शक्ती व आधार असतो. आदिशक्तीच्या सामर्थ्याची त्यांना पूर्ण खात्री असते. आदिशक्तीच्या विरोधांत कार्य करणारे जे कोणी त्यांना आढळतात त्यांचा रुद्रावतार घेऊन ते सर्वनाश करतात....

..... सदाशिव करुणेचा महासागर आहेत; त्या करुणेला सीमाच नाहीत. शरण आलेल्या भक्ताला; तो राक्षस असला तरीही, क्षमा करण्यांत ते मागे-पुढे पहात नाहीत. असे राक्षस लोक आदिशक्तीच्या भक्तांना त्रास देऊ पाहतात. तेव्हा त्यांची लीला दिसून येते. म्हणूनच रामायण-महाभारतासारखे वा ख्रिस्तांना सुळावर चढवण्यासारखे इतिहास घडून आले.... (शिवरात्रीपूजा १९९६)

.....शिवांचा पहिला आशीर्वाद म्हणजे ते तुम्हाला आनंद देतात, आनंदाने पुलकित करतात. त्यांच्या नुसत्या नामस्मरणानें माणसाला आनंद वाटला पाहिजे. जे लोक सतत काही ना काही काम करण्याच्या मागे असतात त्यांची उजवी बाजू क्षीण होते; असे लोक भित्रे,आक्रमक स्वभावाचे बनतात आणि कालान्तराने शिवांपासून दूर होतात.... (शिवरात्री पूजा १९९१)

......उत्थानासंबंधी विचार म्हणजे जीवनाच्या उच्च स्तरावर येण्याचा विचार. त्यासाठीं कमलपत्रासारखे तुमचे चित्त पूर्णपणें निर्लिप्त झाले पाहिजे. ही स्थिती मिळवण्यासाठीं तुम्ही शिवांसारखे साक्षी म्हणजे आदिशक्तीची क्रीडा पहात राहणारे असे शिव-बनण्याचा प्रयत्न करत रहा. अशा निर्लिप्ततेमधूनच तुम्हाला विवेक -शक्ती मिळेल. (शिवरात्री पूजा १९९४)

...... आत्मसाक्षात्कारामध्यें प्रगल्भ होऊन तुम्हाला शिव-तत्त्वापर्यंत पोहचायचे आहे. त्या प्रगतीमधील पहिली खूण म्हणजे तुम्ही आंतमधून निरासक्त व अलिप्त होत जाता. हा शिवांचा मोठा गुण आहे, त्यातूनच तुम्ही सर्व परिस्थितीत आनंद मिळवता. सबंध मानवजातीमध्यें परिवर्तन करण्याची शक्ती तुमच्याजवळ आहे हा आत्मविश्वास तुम्ही बळकट करता. (शिवरात्री पूजा १९९५)

......तुमच्यामध्यें अनेक शक्त्या आहेत; त्या शक्त्यांचा सर्व प्रकारे वापर करा. तुम्ही जेवढे विस्तृत व्हाल तेवढया तुमच्या प्रार्थना विस्तृत होतील; तुमची मुलं कुटुंब एवढ्यासाठीं त्या सीमित राहणार नाहींत; अमर्याद आसमंत त्यामध्यें अंतर्भूत होईल. या भावनेनें आजची शिवपूजा करू या व शिवतत्त्वाचा आदर राखूंया. (शिवरात्री पूजा १९९२)

.......शिव हे सदाशिवांचे प्रतिबिंब म्हणून 'आत्मा' स्वरूपांत आपल्या हृदयांत आहेत. कुण्डलिनी जागृतीनंतर हृदयांतील शिवतत्त्व जागृत होते व चैतन्यस्वरूपानें आपल्या नसा-नसांमधें प्रवाहित होते. त्यातून आपल्यामध्ये, आपल्या बुद्धी व मनामध्यें बदल होत राहतो; सामान्यपणें होणाऱ्या क्रोध आणि मोहाच्या प्रतिक्रिया शांत होतात. कापडे-लत्ते व खाण्यापिण्यांतील आपले लक्ष व आग्रह कमी-कमी होत जातो. ध्यानाचा हा सहज होणारा फायदा आहे. (शिवरात्री पूजा १९९७)

.......शिव-तत्त्व आणि विष्णुतत्त्व हे सूर्य व त्याची प्रभा किंवा चंद्र व त्याचे चांदणे यांच्याप्रमाणें एकत्रच कार्य करतात. सुषुम्ना नाडी ही सोपानमार्ग अर्थात विष्णुमार्ग(मध्य मार्ग)आहे व त्या मार्गामधूनच आपल्याला शिव-तत्त्वापर्यंत जाता येते. म्हणजे विष्णुमार्गा मधूनच शिवतत्त्व प्राप्त होणार आहे. म्हणून या मध्यमार्गमधील सर्व चक्रे सुधारणें आवश्यक आहे. (शिवरात्री पूजा १९९१)

.......शिवांना 'भोळा शंकर' म्हणतात. हा भोळेपणा त्यांचा मोठा गुण आहे व तीच त्यांची शक्ती आहे. ते आदिशक्तीची लीला फक्त पाहणारे साक्षी आहेत. सहजयोग्यांनी हा गुण आत्मसात केला पाहिजे. त्यासाठीं सर्व कांही शक्तीवर सोडले पाहिजे. सर्व नकारात्मक विचार मनांत येऊ देऊ नये. जो पूर्णत: विशुद्ध असतो त्याच्यावर बाहेरच्या कोणत्याही गोष्टीचा परिणाम होत नाहीं ही शक्ती शिवतत्त्वामधून मिळते. (महाशिवरात्री पूजा १९९३)

.......आत्मा हे आपल्यामधील सदाशिवांचे रूप आहे तर कुण्डलिनी हे आपल्यामधील आदिशक्तीचे रूप आहे. (शिव-पूजा १९८७)

.......सहजयोगी कुणालाही वाईट वागणूक देत नाहीं; सहजयोगी कधींही अतिक्रमण करीत नाहीं. आक्रमकपणा दाखवत नाहीं. सहजयोगी वरवरच्या वागण्या-बोलण्याला किंमत देत नाही. सहजयोग्यांबरोबर नव्हे तर इतर लोकांशीही तो सौजन्याने वागतो. हे शिवांचे तत्त्व तुम्ही आत्मसात केले पाहिजे. (शिवरात्री पूजा १९९५)

.......तसे पाहिले तर मी तुमच्यासमोर प्रत्यक्ष असतांना पूजेची आवश्यकता नाहीं.पण त्यासाठीं तुम्ही त्या स्थितीमध्यें उतरायला हवे; आणि त्यासाठींच पूजा करायची असते. मला आशा आहे की तुमच्यापैकी पुष्कळ सहजयोगी ती स्थिती मिळवतील. तीच 'निरानन्द स्थिती' (पूजा प्रवचन १९८५)

## आत्माष्टकम्

मनोबुद्धयहंकारचित्तानि नाहं
न च श्रोत्रजिह्वे न च घ्राणनेत्रे ।
न च व्योमभूमिर्न तेजो न वायु:
चिदानन्दरूप: शिवोऽहम् शिवोऽहम् ॥१ ॥

न च प्राणसंज्ञो न वै पञ्चवायु:
न वा सप्तधातुर्न वा पञ्चकोश: ।
न वाक् पाणिपादं न चोपस्थपायू
चिदानन्दरूप: शिवोऽहम् शिवोऽहम् ॥२ ॥

न मे द्वेषरागौ न मे लोभमोहौ
मदो नैव मे नैव मात्सर्यभाव: ।
न धर्मो न चार्थो न कामो न मोक्ष:
चिदानन्दरूप: शिवोऽहम् शिवोऽहम् ॥३ ॥

न पुण्यं न पापं न सौख्यं न दु:खं
न मन्त्रौ न तीर्थं न वेदा य यज्ञा: ।
अहं भोजनं नैव भोज्यं न भोक्ता
चिदानन्दरूप: शिवोऽहम् शिवोऽहम् ॥४ ॥

# ख्रिसमस पूजा दिनांक २४,२५ व २६ डिसेंबर २००५, बालेवाडी,पुणे (वृत्तांत)

ख्रिसमस पूजेसाठी जगभरातून मोठया संख्येने सहजयोगी स्टेडियममध्ये दिनांक २२ डिसेंबर २००५ पासूनच जमू लागले होते. स्टेडियममध्ये कलकत्त्यावरून मागविलेले स्टेजचे डेकोरेशन तसेच विद्युत डेकोरेशन लावणारे कलाकार १०-१२ दिवस अगोदरपासून स्टेडियमध्ये काम करीत होते.एकूणच सर्व तयारीसाठी बरेच सहजयोगी ८-१०दिवस आधीपासूनच स्टेडियममध्ये आले होते.

दिनांक २४.१२.२००५

आजच्या दिवसाची सुरूवात सकाळी ६.३० वा ध्यानाने झाली. त्यावेळी श्रीमाताजींचे भाषणाची सी.डी. लावली होती. सकाळच्या ध्यानासाठी व दिवसभरच्या कार्यक्रमासाठी स्वतंत्र मंडप उभारला होता. ध्यानानंतर त्याच पेंडॉलमध्ये ९.३० च्या सुमारास हवन ठेवले होते. मोठे हवन कुंड रांगोळी व फुलांनी सजवले होते. हवनासाठी श्रीमाताजींच्या कुटुंबाच्या वतीने खास श्री आनंद वर्मा साहेब तसेच ट्रस्टी श्री राजेंद्र पुगालिया तसेच अनेक देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

हवनाच्या सुरवातीला गणेश भजन त्यानंतर गणेश मंत्र, तीन महामंत्र, अग्निदेवतेचा मंत्र, गणेश अर्थवशीर्ष, त्यानंतर श्रीमाताजींची १०८ नावे घेण्यात आली. त्यानंतर श्रीआनंद भैय्या, श्री पुगालिया व इतर लिडर्स यांनी आरती केली. त्यावेळी सर्वत्र प्रचंड चैतन्य जाणवत होते. त्यानंतर श्री नलगिरकर यांनी श्रीमाताजींच्या आशीर्वादाने ठरलेल्या नवीन वधु -वरांची नावे जाहीर करून सर्वांना स्टेजवर बोलावून ओळख करून दिली. साधारण दुपारी २.०० च्या सुमारास हा कार्यक्रम संपला.

संध्याकाळी मुख्य स्टेडियममध्ये साधारण ७.०० च्या सुमारास स्टेजसमोरील पडदा बाजूला झाला आणि स्टेजवरील अतिभव्य डेकोरेशन व मधोमध श्रीमाताजींचे भव्य सिंहासन दृष्टीस पडले. सुरूवातीला श्री पराग राजे यांनी सर्वांचे स्वागत केले आणि आजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करण्यासाठी श्री गौतम साहेबांना आमंत्रित केले.स्टेजवरील कार्यक्रमाची सुरूवात पुणे म्युझिक ग्रुपने तीन महामंत्रांनी केली. त्यानंतर 'आज आमच्या धामी आल्या माता निर्मला देवी' हे भजन गायले. त्यानंतर वैतरणा म्युझिक ॲकॅडमीच्या विद्यार्थ्यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी सुरूवातीला हे निर्मल माँ तव चरण मे नमन है बारंबार, त्यानंतर बासरी वादन केले. त्यानंतर विश्व निर्मल प्रेम आश्रमच्या कलाकार मुला मुलींचे स्टेजवर आगमन झाले.त्यांनी सुरूवातीला,'परमेश्वरी भगवती निर्मला हमे तेरे निर्मल का आश्रय मिला', 'चरणो मे माँ तेरे चरणो मे', 'मूलाधाराच्या गणेश देवा गोंधळाला या', ही भजने सादर करीत शेवटी 'गणेश वंदना' हा नृत्य प्रकार सादर करताना हातात पेटते दिवे घेऊन नृत्याचे अनेक प्रकार सादर केले.

त्यानंतर धरमशाळेचे कार्यक्रम सुरू झाले. त्यांनी सुरूवातीला तीन महामंत्रावर नृत्य प्रकार सादर केले. हिमाचल प्रदेश नृत्य प्रकार, सादर केला. त्याचवेळी कल्पनादीदी व साधनादीदी यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांच्यासमोर स्टेजवर भांगडा सादर करताना अनेक मनोरे स्टेजवर उभे करून सर्वांची वाहवा मिळविली. शेवटी त्यांनी 'महाराष्ट्रीन' व 'दक्षिणेकडील' असे एकत्र नृत्याची जुगलबंदी सादर करून सर्वांना चकित केले.

त्यानंतर पुणे म्युझिक ग्रुपने 'माता करम है मेरी माता का करम है' ही कव्वाली सादर केली. त्यानंतर १०.०० च्या सुमारास स्टेजवर प्रसिद्ध गायक श्री गुलाम आली मुस्ताफा खान व सहकारी यांचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी सुरवातीला राग 'बिहाग' सादर केला.त्यानंतर 'सद्गुरु हो महाराज', 'जैसे फुलसुगंध वैसे हृदय

प्रीत तुम्हारी', 'तेरा नाम बडा अनमोल निर्मल माँ' ही भजने सादर केली . त्यानंतर त्यांच्याच ऑर्केस्ट्रा ग्रुपचे स्टेजवर आगमन झाले. त्यांनी सुरवातीला वेगवेगळ्या रागांचे मिश्रण सादर केले. त्यानंतर कव्वाली सादर केली. शेवटी श्री गुलाम अली मुस्तफा यांनी हे राम हे भजन गायले त्यानंतर त्यांचा सत्कार सौ कल्पनादीदी व साधनादीदींनी केला. कार्यक्रम संपला तेव्हा रात्रीचे ११.३० वाजले होते. त्यानंतर ज्यांची लग्ने निश्चित झाली अशा सर्व जोडप्यांची नावे वाचून दाखविण्यात आली.

२५ डिसेंबर २००५

आज पूजेचा दिवसाची सुरूवात सकाळी ६.३० च्या सामूहिक ध्यानाने झाली. श्री धनंजय धुमाळ यांनी सिंथेसायझरवर राग वाजवून ध्यान घेतले. त्यानंतर सकाळी १०.३० च्या सुमारास दिवसाच्या कार्यक्रमाची सुरूवात तीन महामंत्रांनी झाली. त्यानंतर श्री वझे यांनी 'आवो आवो शाम' हे भजन सादर केले. त्यानंतर एका सहजयोगीनीने, 'मोरे माताजी मेहरबान', 'निर्मला देवा वाचूनी माझा देव्हारा वाटे सुना', चि.देशपांडे याने राग यमन मध्ये करो साधना हे भजन सादर केले. कु.अर्चना -ठाणे हिने,' प्यार भरे ये दो निर्मल नैन', सलिम टर्कि यांनी सितार वादन केले. त्यानंतर कलकत्ता म्युझिक ग्रुपने रवींद्रनाथ टागोर यांचे , 'आनंद लोके' हे भजन सादर केले. पुणे - सासवड सेंटर तर्फे गोफ़ नृत्य ढोल- ताशाच्या तालावर सादर करताना त्यामध्ये नृत्य करीत गोफ विणत व गोफ सोडवण्याचे प्रकार सादर केले. राधिका देशमुख -पुणे ह्या बाल कलाकाराने, स्वागतम हे नृत्य सादर केले. आंध्र प्रदेशच्या लक्ष्मी-अर्पना ह्या जोडीने तेलगू गाणे गायले. हैद्राबादच्या श्रीमती देशपांडे यांनी संस्कृतमध्ये श्रीमाताजीची स्तुती सादर केली. बाल कलाकार चि.दिव्यांशु ह्याने, जय गणेश भजन सादर करून सर्वांची वाहवा मिळवली.

त्यानंतर १२.३० च्या सुमारास धरमशाळेच्या मुलांनी सुरवातीला, 'मैया साचा नाम तेरा', 'माँ की शरण मे आजा' ही दोन भजने सादर केली. अमरावती कलेक्टिव्हीटीने, 'सहज मिले बडी भागा सादो' हे भजन सादर केले. शिवानी उजैन हीने, कॅसेटवर 'मैया माखन मै नही खायोरी' ह्या भजनावर नृत्य सादर केले. नेपाळ ग्रुपने 'दया कर निर्मल माँ', राजेश युनिव्हर्सल व कुमारी आनंदिता 'दमादम मस्त कलंदर', दिल्ली युवाशक्तीने आदिशक्तीचे सहजयोगाच्या संदर्भातील आगमनावर आधारित नाटिका सादर करताना त्यामध्ये त्यांनी शिव, ब्रह्म , आदिशक्ती इत्यादीची रूपे सादर केली. त्यानंतर मुंबई -वाशी ग्रुपने महाराष्ट्रीय नृत्य सादर करताना गणेश वंदना, साई वंदना, लावणी व लेझीम हे प्रकार सादर केले. आजच्या कार्यक्रमाचा शेवट विश्व निर्मल विद्यालय पुणे च्या बाल कलाकारांनी श्रीमाताजींच्या स्वातंत्र्य चळवळीतील सहभागावर आधारित नाटिका सादर करताना त्यामध्ये खुबीने श्रीमाताजींच्या भाषणाचा वापर केला. शेवटी सर्वांनी वन्देमातरम् हे गीत सादर केले.

मुख्य स्टेडियममध्ये आजचा पूजेचा दिवस असल्याने सर्वजण लवकरच उपस्थित राहिले होते. आज स्टेडियममध्ये जास्त गर्दी जाणवत होती. साधारण ७.०० च्या सुमारास स्टेजसमोरील पडदा बाजूला झाला आणि सर्वांना स्टेजवर श्रीमाताजींचे फुलांनी सजविलेले सिंहासन व स्टेजवरचे डेकोरेशन नजरेस पडले. श्रीमाताजींच्या आगमनापूर्वी सुरवातीला श्री आपटेंनी 'तेरो ध्यान अती पावन', सुब्रमण्यम 'वंदना वंदना', धनंजय धुमाळ व लता धुमाळ, 'विजयी निर्मला शारदे', पुणे ग्रुप 'आज बनो तम म्हारा पावणा', राजेश 'जीसकी जुबापे', संजय तलवार 'सिटींग इन द हार्ट', सुरेखा आपटे 'तुम आशा विश्वास हमारा' ही भजने सादर होत असताना

सर्वत्र पूजेचे वातावरण निर्माण झाल्याचे जाणवत होते. त्यानंतर श्रीमाताजींची ९८ सालची ख्रिसमस पूजेची सीडी दाखविण्यात आली.

साधारण ९.०० च्या सुमारास आकाशात फटाक्यांची आतषबाजी दिसू लागली आणि सर्व सहजयोगी श्रीमाताजींच्या आगमनाची चाहूल लागल्याने उभे राहिले.त्याचवेळी सर्वत्र प्रचंड चैतन्य जाणवू लागले. श्रीमाताजींची गाडी स्टेडियममध्ये प्रवेश करताना बाजूला मद्रासी सहजयोगी हातात पंचारती घेऊन श्रीमाताजींचे स्वागत करीत होते. सर्वजण स्वागत आगत स्वागतम् हे गीत म्हणत होते. श्रीमाताजीं सोबत पापाजी कल्पनादीदी, साधनादीदी, अनुपमा दिदी, आनंद साहेब उपस्थित होते.

स्टेजसमोरील पडदा बाजूला झाला आणि सर्वांना श्रीमाताजींचे साकार रूपातील दर्शन घडले. सुरूवातीला श्रीमाताजींना दोन सुवासिनींनी ओवाळले. त्यानंतर त्यांच्या चरणावर पुष्पमाला अर्पण करण्यात आली. त्यानंतर लहान मुलांनी श्रीमाताजींच्या चरणावर फुले वाहून पूजा केली. त्यानंतर कल्पनादीदी व साधनादीदीनी श्रीमाताजींचा साज श्रृंगार केला. सात सुवासिनींनी ओटी भरली. त्यावेळी पूजेतील भजने सादर करताना, 'बिनती सुनिए', 'नमो नमो मारिया', 'गणेश अथर्वशीर्ष', 'जागो सवेरा', 'हासत आली', 'विश्व वन्दिता' ही भजने झाली. शेवटी सर्वजण उभे राहून श्रीमाताजींची आरती केली. सर्वांना श्रीमाताजींचे पूजेतील रूपाचे दर्शन मिळाले. सर्वत्र प्रचंड चैतन्य जाणवत होते.

त्यानंतर श्रीमाताजींच्या चरणावर महाप्रसाद अर्पण करण्यात आला. त्यानंतर श्रीमाताजींच्या समोर केक मांडण्यात आला. श्रीमाताजींनी पापाजींच्या मदतीने केक कापला श्रीमाताजींना पापाजींनी केक भरवला. त्यानंतर श्रीपापाजींनी एक केक कापला त्यांना कल्पनादीदी व साधनादिदींनी केक भरवला. त्यानंतर श्रीमाताजींना जगभरातून आलेल्या सहजयोग्यांच्या वतीने प्रत्येक देशातर्फे भेट सादर करण्यात आली. सदर भेटवस्तू पहात असताना श्रीमाताजी अतिशय आनंदी दिसत होत्या. त्यानंतर श्रीमाताजी आपल्या निवासस्थानी परतल्या.श्रीमाताजींचे दर्शन मिळाल्याने त्यांची मानव रूपातील प्रकृती चांगली असल्याचे डोळ्याने पाहिल्याने जगातील सर्व कानाकोपऱ्यातून आलेल्या सर्व उपस्थित सहजयोग्यांच्या चेहऱ्यावर प्रचंड आनंद, समाधान जाणवत होते.

बाहेरच्या बाजूला पूजेसाठी जमलेल्या सर्व सहजयोग्यांना महाप्रसादाचे जेवण अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने देण्यात येत होते. त्यानंतर स्टेडियममध्ये लग्नाच्या मेहंदी काढण्याचा कार्यक्रम रात्री उशिरापर्यंत चालू होता. त्याचवेळी विदेशी लोकांसाठी असलेल्या जेवणाच्या हॉलमध्ये सर्वजण भजन गात नाचत होते. रात्री ३:०० पर्यंत हा कार्यक्रम चालू होता. त्यावेळी एक सहजयोगी सांताक्रासचा पेहराव करून सर्वांना गिफ्ट वाटत नाचत होता. सर्वजण आनंदाने बेहोष झाले होते.

<u>२६ डिसेंबर २००५</u>

आजच्या दिवसाची सुरवात सकाळच्या सामूहिक ध्यानाने झाली. त्यानंतर साधारण ९.३०च्या सुमारास हळदीचा समारंभ सुरू झाला. त्यावेळी सर्वजण नाचत हळद खेळत होते. हळदी समारंभ संपल्यानंतर इकडे सकाळच्या कार्यक्रमाची सुरवात झाली. त्यामध्ये अनेक राज्यातील सहजयोगी कलाकारांनी भाग घेतला. कालच्या व आजच्या सकाळच्या भजनाच्या कार्यक्रमाचे नियोजन श्री पराग राजे यांनी केले होते. अंदमानचे श्री मनोज भट्टाचार्य यांनी 'हम तो सदा ध्यान करते माँ', आसाम, 'जय श्री माताजी निर्मला', नाशिक, 'सहजदायिनी निर्मल माँ', त्यानंतर तबला व हार्मोनियमची जुगलबंदी झाली. आशिष वर्मा 'प्यार भरे ये दो

निर्मल नैन', शामली,' माँ तेरे निर्मल प्रेम को मेरा शत शत प्रणाम', त्यानंतर वाशी हेल्थ सेंटरच्या डॉक्टरांनी सेमिनार घेऊन सर्वांना स्क्रिनवर माहिती दाखवित अनेक आजारांवर सहजयोग माध्यमातून प्रयोग केल्यास कसा फरक पडू शकतो ते सांगितले. तसेच उपस्थित सहजयोग्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली.

संध्याकाळी ६.०० च्या सुमारास मेडिटेशन पेंडॉलमध्ये नवरदेवांना बसविण्यात आले.त्यावेळी श्रीमाताजींच्या चरणाची पूजा केली. त्यावेळी प्रत्येकाने समोर असलेल्या श्रीमाताजींच्या फोटोसमोर फुले वाहिली. इकडे मुख्य लग्न होणार असणाऱ्या सायकल स्टेडियममध्ये लग्नाची तयारी सुरू होती. सर्व नववधूना बसविण्यात आले. त्यांच्याकडून श्रीमाताजींच्या पुढे फुले वाहून गौरी पूजन करण्यात आले. त्यावेळी बाजूला नाशिकचे धुमाळ आणि सहकारी सनईची धून वाजवत होते.त्यानंतर सर्व नववधूंना त्यांच्या क्रमांकानुसार अंतरपाटाच्या मागे उभे करण्यात आले होते. त्यांच्या हातात हार देण्यात आलेहोते. त्याच सुमारास मेडिटेशन हॉलपासून मिरवणुकीने वाजत-गाजत नवरदेवांना लग्न मंडपात आणले. त्यांना अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने त्यांच्या क्रमांकावर उभे करण्यात येत होते. सर्व नवरदेव आल्यानंतर सहजयोगाच्या मंगलाष्टका सर्वांनी म्हटल्या. त्यानंतर एकमेकांना हार घालून प्रत्येक जोडप्याला हवन कुंडाजवळ बसवले. त्यानंतर सप्तपदी, कन्यादान, हे विधी चालू असतानाच लग्न मंडपात ९.१५ च्या सुमारास प्रत्यक्ष श्रीमाताजीं, पापाजी, कल्पनादीदी व साधनादीदीं व आनंदजींचे स्टेजवर आगमन झाले. आज श्री माताजींनी निळ्या रंगाची साडी नेसली होती. त्या अत्यंत सुंदर व प्रसन्न दिसत होत्या. त्यांना सहजयोगी भगिनींनी ओवाळले. त्यानंतर त्यांच्या चरणावर पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर त्यांच्यासमोर लग्नाचा पुढील सोहळा पार पडला. त्यानंतर सर्व वधु-वरांना स्टेजसमोरील जागेत बसविण्यात आले. तेथे वधू-वरांनी एकमेकांना घास भरविण्याचा कार्यक्रम होता. त्याचवेळी श्रीमाताजीं सर्व वधू- वरांना आपल्या साकार रूपातील दर्शनाने आशीर्वादित करून परत आपल्या निवासस्थानी निघाल्या.

त्यानंतर प्रत्येक जोडप्याला श्रीमाताजींच्या वतीने चांदीची भांडी देण्यात आली. त्यांना जेवणाचे देऊन प्रत्येक जोडप्याला एकमेकांना भरवण्याचा कार्यक्रम झाला. त्याचवेळी प्रत्येक जोडीसमोर स्पिकर धरून त्यांना नाव घेण्यास सांगितले. शेवटी पुणे म्युझिक ग्रुपने 'माता का करम है' ही कव्वाली गाऊन सर्वांना नाचवले आणि कार्यक्रम संपला. सेमिनारची तयारी नियोजन हे श्रीमाताजींच्या कृपेत ट्रस्टी श्री राजेंद्र पुगालिया यांच्या मार्गदर्शनात सर्व सहकाऱ्यांनी उत्कृष्ट प्रकारे केले होते. ह्यावेळी कलकत्यामधील कलाकारांनी केलेले स्टेजचे कोरीव कामाचे डेकोरेशन तसेच विद्युत कमानींची आरास तसेच पूजेनंतर सर्व सहजयोग्यांना दिलेल्या महाप्रसादाचे जेवण तसेच सर्वांची राहण्याची उत्कृष्ट व्यवस्था सर्वांच्या लक्षात राहण्यासारखी होती.

सर्वात संस्मरणीय गोष्ट म्हणजे पूजेमध्ये प.पू.श्रीमाताजींचे स्टेजवर साकाररूपातील आनंदी दर्शन तसेच त्यांची मागच्यावेळेपेक्षा जास्त वेळ असलेली उपस्थिती, तसेच लग्नाच्या दिवशी प्रत्यक्ष लग्नमंडपातील त्यांचे सर्वांना झालेले प्रसन्न आनंदी रूपातील दर्शन ह्यामुळे सर्व सहजयोगी आनंदी झाले होते.

---

तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ॥
करुनी घेयावे हे तुमते । विनवितु असे ॥

## म्युझिक प्रोग्राम १५ डिसेंबर २००५ प्रतिष्ठान, पुणे





## म्युझिक प्रोग्राम २० डिसेंबर २००५ प्रतिष्ठान, पुणे





## म्युझिक प्रोग्राम ८ जानेवारी २००६, प्रतिष्ठान, पुणे





# म्युझिक प्रोग्राम, ख्रिसमस पूजा, बालेवाडी, पुणे













